म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ५०९

REFBK-0004614

# ध्रुवाख्यानाचा खरा कर्ता उद्धवचिद्घन

( ध्रुवाख्यान व प्रियाळचरित्र या काव्यासह )

१८३२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५०८



लेखक,
अ. का. प्रियोळकर बी. ए.

# ध्रुवाख्यानाचा खरा कर्ता उद्धवचिद्घन

( ' लोकशिक्षण ' मासिकांतून प्रसिद्ध झालेला निबंध )

लेखक

अ. का. प्रियोळकर, बी. ए.

६ डामरलेन, गांवदेवी, मुंबई

REFBK-0004614

४६१४

जानेवारी १९३२

# ध्रुवाख्यानाचा खरा कर्ता उद्धवचिद्घन

लेखकः—श्री. अ. का. प्रियोळकर, बी. ए.

काव्याच्या अनेकांनीं अनेक व्याख्या केलेल्या आहेत. परंतु त्यांपैकीं 'वाक्यम् रसात्मकं काव्यम्' ही विशेष अर्थबोध करणारी आहे. ट ला ट आणि प ला प जुळवून पद्य निर्माण होईल; परंतु त्यामध्यें जर रस नसला तर त्या कृतीस काव्य म्हणतां येणार नाहीं. उलट सरस गद्यालाहि आपण काव्य—गद्यकाव्य म्हणतों. रस हा काव्याचा आत्मा आणि भाषा व रचना हा त्याचा देह होय. उत्कृष्ट काव्यकृति रसपूर्ण आणि भाषेच्या व रचनेच्या दृष्टीनें ठाकठीक व शुद्ध असली पाहिजे. भाषा व रचना हें कवितेचें बहिरंग जरी कितीहि व्यवस्थित असलें तरीपण जर त्यांत रस नसेल तर तें काव्य निर्जीव पुतळ्यासारखें होय. उलट भाषा व रचना सदोष असूनहि जर काव्य रसभरित असेल तर तें एखाद्या सद्‌गुणमंडित कुरूप पुरुषाप्रमाणें जगाला विलक्षण चटका लावून सोडतें. याचें एक उत्कृष्ट उदाहरण सांगावयाचें म्हणजे दिंडी वृत्तांतील ध्रुवाख्यान हें करुण, भक्ति व वत्सल या रसांनीं ओथंबलेलें मराठी काव्य होय. ध्रुवाची कथा भागवताच्या चतुर्थ स्कंधांत मैत्रेय ऋषीच्या तोंडीं घातलेली असून ती त्यानें भगवद्भक्त विदुराला निवेदिली आहे. मत्स्यपुराणाच्या चवथ्या अध्यायांतहि ही कथा दिलेली आहे. हें सुंदर आख्यान अनेक महाराष्ट्र—साहित्यसेवकांच्या काव्यस्फूर्तीला कारण झालेलें आहे. सुप्रसिद्ध कवि अमृतराय यानें चूर्णिका वृत्तांत हें आख्यान लिहिलें आहे. वामनपंडिताच्या एका शिष्यानें विविध छंदांमध्यें या कथेची मांडणी केलेली आहे. दुसऱ्या एका अनामक कवीनें आर्यावृत्तांत 'मंत्रमय ध्रुवाख्यान' रचलेलें आहे. याशिवाय मोरोपंत, चिंतोराम, नरहरितनय, जगजीवनप्रभु या कवींनींहि ध्रुवचरित्रावर काव्यरचना केलेली आहे. आतांच सांगितलेल्या या काव्यांचें

अस्तित्व फार थोड्यांना माहीत असेल. परंतु या सर्वांपेक्षांहि लहान असलेलें उपरिनिर्दिष्ट दिंडीवृत्तांतील ध्रुवाख्यानच अत्यंत लोकप्रिय होऊन आबाल-वृद्ध स्त्रीपुरुषांच्या तोंडीं खेळत आहे. आजहि एखाद्यानें दिंडी वृत्तांत काव्य-रचना केलेली वाचली किंवा ऐकिली म्हणजे आपणांस या सुरस काव्याची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. ' लहान मूर्ति पण थोर कीर्ति ' अशा-प्रकारचें हें काव्य आहे.

हें काव्य प्रथमतः नवनीतांत प्रसिद्ध झालें. परंतु १८५४ सालीं ज्या-वेळीं कै. परशुरामतात्यांनीं नवनीताची पहिली आवृत्ति छापली त्यावेळीं या काव्याचा समावेश त्या पुस्तकांत झाला नव्हता. नवनीताची चवथी (१८६२), पांचवी (१८६४) व सातवी (१८७१) या आवृत्त्या मीं पाहिल्या, त्यांच्यामध्यें हें काव्य नाहीं. १८६३ सालीं तात्यांनीं 'नवनीत भाग २ रा, कवितासारसंग्रह ' प्रसिद्ध केला, त्यांत हें काव्य प्रथमतः छापलें गेलें व पुढें हे दोनहि भाग एकत्र करण्यांत आले, असें पुण्याच्या ट्रेनिंग कॉले-जचे प्रिन्सिपल, श्री. तावडे यांच्याकडे शोध केला असतां त्यांच्याकडून मला कळलें. १८५४ पासून १९२३ पर्यंत झालेल्या सतराहि आवृत्तींत हें काव्य असावें असें 'मुमुक्षु' मध्यें (एप्रिल १९२९) 'कल्याण श्रीराम' नांवाच्या एका लेखकानें जें लिहिलें आहे, तो त्याचा समज अर्थातच चुकीचा म्हणावा लागतो.

दा. क. ४६१०

नवनीतामध्यें हें काव्य चिंतामणीचें म्हणून छापलें गेलें आहे. परशुराम-तात्यांनीं नवनीतांत कर्त्यांचीं चरित्रें दिलीं नव्हतीं. परंतु सन १८७८ सालीं ज्यावेळीं या पुस्तकाची नववी आवृत्ति काढावयाची झाली, त्यावेळीं विद्या-खात्याचे त्यावेळचे ' दैरेक्तर ' मि. चॅट्‌फील्ड यांनीं हें काम श्रीकृष्णशास्त्री तळेकर व रावजीशास्त्री गोडबोले या विद्वद्द्वयाकडे सोंपविलें. त्यावेळीं ज्या कवींच्या काव्यांचे नवनीतामध्यें उतारे घेतले त्यांचीं स्वल्प चरित्रें देण्याचा उपक्रम करण्यांत आला. परंतु ध्रुवाख्यानाचा हा चिंतामणि कोण याचा उलगडा त्या संपादकद्वयाला झाला नाहीं; आणि अर्थातच त्याचें चरित्र त्यांना

देतां आलें नाहीं. अद्यापि हा प्रश्न सुटला नसून नवनीताच्या अगदीं ताज्या आवृत्तींतहि चिंतामणीच्या नांवाखालीं " हा कवि कधीं व कोठें झाला याविषयींची माहिती मिळत नाहीं " अशी तळटीप दिलेली आढळते. रघुनाथशास्त्री गोडबोले यांनींहि आपल्या भरतखंडाच्या अर्वाचीन कोशांत असेंच लिहिलें आहे.

हा चिंतामणि कोण हेंच केवळ कोडें नसून हें काव्य चिंतामणीचेंच कीं काय असाहि एक नवा प्रश्न हल्लीं उपस्थित झालेला आहे. कारण सुप्रसिद्ध संतकवि उद्धवचिद्‌घन याच्या नांवाखालीं याच काव्याच्या अनेक प्रती सांपडत आहेत. नवनीतांतील ध्रुवाख्यानाच्या शेवटीं,

ध्रुवाख्यान ऐकती गाति वाचे । ध्रुवासनींही अढळ वास त्यांचे ॥
**चिंतामणी** गावोनि गुण साचे । सौख्य पावोनी हरीपदीं नाचे ॥

असा नामोल्लेख असून त्याच्या एकंदर सत्तावीस दिंड्या आहेत.

उद्धवचिद्‌घनाच्या नांवाखालीं असलेलें हें काव्य 'कल्याण श्रीराम' यांनीं मुमुक्षूमध्यें ( एप्रिल १९२९ ) जें प्रसिद्ध केलें आहे त्याची संख्या पसतीस आहे आणि त्यांत कवीचे नामोल्लेख दोन ठिकाणीं आहेतः—

... ... म्हणे उद्धवचिद्‌घन दयावंत ॥ २३ ॥

आणि शेवटीं

औदार्याची क्षीराब्धिशयनाचें । उद्धवचिद्‌घन गुण गाय त्याचे ॥ ३५ ॥

उद्धवचिद्‌घनाचें नांव असलेलें हें काव्य जरी नुकतेंच दोन वर्षांपूर्वीं *प्रसिद्ध झालें, तरी श्री. आजगांवकर यांनीं १९१४ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'महाराष्ट्रकविचरित्रा'च्या तिसऱ्या भागांत (पृ. ११२) उद्धवचिद्‌घनाचें जें चरित्र दिलें आहे त्यांत या काव्याच्या कांहीं हस्तलिखित प्रतींमध्यें उद्धवचिद्‌घनाचें नांव आढळतें असें नमूद केलें आहे. १९१५ सालीं श्री. गो. का.

*__उपयुक्तकथासंग्रह__, आवृत्ति १ ली, भाग दुसरा ( जगदीश्वर छापखाना ) या इ. स. १८७६ मध्यें छापलेल्या पुस्तकांत हें काव्य **उद्धवचिद्‌घनाच्या** नांवावर असल्याचें मला आतां आढळलें आहे [ पृ. १६३ पाहा ].

चांदोरकर यांनीं जी 'महाराष्ट्र–संतकवि–काव्यसूची'* (११००–१७४९) प्रसिद्ध केली आहे तिच्यामध्यें उद्धवचिद्घनाचें नांव अललेली हस्तलिखित प्रत कै. भावे यांच्याकडे असल्याचें नमूद आहे.

'कल्याण श्रीराम' यांनीं चिंतामणि व उद्धवचिद्घन यांच्या नांवांवर असलेलीं हीं दोनहि काव्यें जोडीनें मुमुक्षूमध्यें प्रसिद्ध केलीं असून उद्धवचिद्घनकविकृत 'ध्रुवाख्यानाच्या हस्तलिखित' प्रतींत शेवटीं असलेला,

वैकुंठाहुनि तो गरुड हरिनें तात्काळ पालाणिला ।
जेथें उग्रतें धरुनि महिला त्या पर्वतीं स्थापिला ॥
शक्ता दुर्लभ उंच थोर पद जें तेथें ध्रुव स्थापिला ।
मेरूचे शिखरीं अनंतकविनें लक्षोनिया वंदिला ॥

हा अनंतकवीचा श्लोकहि दिलेला आहे; आणि पुढें 'कल्याण श्रीराम' लिहितात:–"पुढें येणाऱ्या ध्रुवाख्यानावरून संशय उत्पन्न होईल कीं, हें ध्रुवाख्यान कुणाचें ? उद्धवचिद्घनाचें कीं अनंताचें का चिंतामणीचें ? कदाचित् चिंतामणि व अनंत उद्धवचिद्घनाच्या शिष्यवर्गांपैकीं कोणीतरी असावेत. पण तसा पुरावा आजपर्यंत उपलब्ध असलेल्या उद्धवचिद्घनाच्या कवितेंत मिळत नाहीं; व चिंतामणीच्या नांवाखालीं अन्यकांहीं आख्यानें असल्याचें आजवर आढळत नाहीं. तेव्हां हें ध्रुवाख्यान कोणाचें हें ठरविणें भविष्य काळावर सोपवूं." श्री. आजगांवकरांनींहि नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ध्रुवाख्यानाच्या स्वतंत्र आवृत्तींत सुद्धां "या ध्रुवाख्यानाचा कर्ता कोण हें ठरविण्याचें काम फार कठीण आहे" असें म्हटलेलें आहे.

आतां हें कोडें उलगडावयाचें झाल्यास चिंतामणि व उद्धवचिद्घन यांच्या वैयक्तिक माहितीचा शोध करून या कवींचीं आणखी कांहीं काव्यें असतील त्यांच्याशीं हें काव्य ताडून पाहिलें पाहिजे. म्हणजे या काव्याचे कर्तृत्व कोणाकडे जातें हें निश्चयानें सांगतां येईल. यांपैकीं उद्धवचिद्घनासंबंधीं कांहीं चमत्कारपूर्ण माहिती भक्तविजयाच्या ५६ व्या अध्यायांत

* प्रकाशक–सत्कार्योत्तेजक मंडळी, धुळें.

महिपतीनें दिलेली आहे. ती अशी कीं, हा संत धारूर येथील असून बेदर येथें रामनवमीच्या उत्सवाला तो गेला असतां कीर्तनप्रसंगीं यवनांनीं त्यांच्या उत्सवाचा विघाड केला. त्यामुळें हनुमान् क्रोधायमान होऊन त्यानें मुसलमानांच्या पोटांत शूळ उत्पन्न केला व मशीद पाडून टाकिली. शेवटीं मुसलमान त्याला शरण आले. उद्धवचिद्घनानें 'मृत्युंजयचरित्र' नांवाच्या साकीबद्ध कवितेंत,

शहा महंमद तो बमणी करि बेदरिंची पाच्छाई ।

असा उल्लेख केलेला आहे. या महंमदशहाचा काळ* इ. स. १४६३–८२ असल्यामुळें हा महंमदशहानंतर होऊन गेला असला पाहिजे हें उघड आहे; आणि महिपतीनें (शके १६३७–१७१२) आपल्या भक्तविजयांत त्याचें चरित्र दिल्यामुळें महिपतीच्या पूर्वीं त्याचा कर्तृत्वकाल असला पाहिजे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. श्री. गो. का. चांदोरकरकृत महाराष्ट्रीय काव्य-सूचीमध्यें, आनंदनाथ महाराजांनीं आपल्या 'भक्तमंजिरी' ग्रंथांत उद्धवचिद्-घनाची गुरुपरंपरा दिलेली उतरून घेतलेली आहे ( पृ. १२ ), तिजमध्यें उद्धवचिद्घनाचा काल शके १५७५ ते १६२० असा दिलेला आहे. हा 'भक्तमंजिरी' ग्रंथ अद्यापि अप्रकाशितच असून कै. भावे यांच्या संग्रहीं असल्याचें सदरहू काव्यसूचीवरून दिसतें. उद्धवचिद्घनकृत हजारावर पद्य-संख्येचा व सुमारें दीडशें पृष्ठांचा कवितासंग्रह काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाला आहे.

उद्धवचिद्घनाची जरी आपणांस इतकी माहिती मिळते, तरी चिंतामणीचें तसें नाहीं. त्याच्या चरित्रासंबंधीं माहिती तर नाहींच, परंतु त्याच्या अन्य काव्यांसंबंधींहि माहिती नाहीं. 'कल्याण श्रीराम' यांनीं चिंतामणीच्या नांवाखालीं अन्य आख्यान नाहीं असें लिहिलेलें आहे. श्री. आजगांवकरांनीं नुकतेंच जें ध्रुवाख्यान प्रसिद्ध केलें आहे त्याच्या प्रस्तावनेमध्यें, ध्रुवाख्याना-शिवाय 'चिंतामणिशकुनवंती' नांवाचें एक पुस्तक चिंतामणीच्या नांवावर उपलब्ध आहे इतकी माहिती दिली आहे.

---

***मुसलमानी रियासत** ( आवृत्ति पहिली), पृ. २६३

काव्यसंग्रहामध्यें गोपीचंदाख्यान व सीतास्वयंवर अशीं दोन आर्याबद्ध काव्यें चिंतामणीच्या नांवावर प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं सीतास्वयंवराच्या खालीं, "कवीचें ध्रुवाख्यान प्रसिद्ध आहेच.शिवाय कांहीं पदें आमच्यापाशीं आहेत. या कवीचा जीवनवृत्तांत माहीत नाहीं." अशी संपादकांनीं तळटीप दिलेली आहे. 'श्री सांप्रदायिक विविध विषय' (प्रथम खंड) या पुस्तकामध्यें चिंतामणि या नांवाखालीं, कारंजे मठांत कांहीं कविता (पृ. २१), डोमगांव मठांत मल्हारिमाहात्म्य (पृ. २७९), व भालगांव मठांत शिवदिनशिष्य[1] चिंतामणीची स्फुट कविता आढळल्याचें नमूद आहे (पृ. ८९). आतां हे सर्व चिंतामणि एकच कीं काय हें त्यांची मूळ कविता पाहिल्यावांचून ठरविणें अशक्य आहे.

एकाच नांवाचीं माणसें अनेक असतात. परंतु ध्रुवाख्यानकर्ता व सीतास्वयंवरकर्ता चिंतामणि एकच असें जें सीतास्वयंवराख्यानाच्या तळटीपेंत[2] कै. वा. दा. ओक यांनीं म्हटलें आहे तें खरें मानिल्यास या चिंतामणीची जास्त माहिती मिळूं शकेल. कारण कै. ज. बा. मोडक यांनीं काव्येतिहाससंग्रहांत[3] जें सीतास्वयंवराख्यान प्रसिद्ध केलें आहे त्याच्या शेवटीं, 'इति श्री ज्योतिर्विद्राजजीवसूनुचिंतामणिविरचितः सीतास्वयंवरः समाप्तः।' असा मजकूर आहे. त्यावरून हा सीतास्वयंवरकार चिंतामणि एका ज्योतिर्विदाचा मुलगा असल्याचें दिसतें.चिंतामणीची एक शकुनवंती प्रसिद्ध असल्याचें श्री.आजगांवकर म्हणतात. याशिवाय चिंतामणिपंडितकृत 'रमलदीपिकाकलिका' नांवाचा एक ग्रंथ सांपडल्याचें कै. राजवाडे यांनीं भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या १८३७ च्या इतिवृत्तांत (पृ. १४) लिहिलें आहे. 'रमलशास्त्र' नांवाचा चिंतामणीचा एक ग्रंथ असल्याचा कै. साने यांनीं चिटणीसकृत 'सप्तप्रकरणात्मक चरित्रा'च्या प्रतीमध्यें उल्लेख केलेला आहे. हे ज्योतिषविषयक ग्रंथ मला पाहावयास सांपडलेले नाहींत. त्यामुळें त्यांच्या कर्त्यांचा काल व स्थळ निश्चित करण्यास लागणारा

१ शिवदिनकेसरीचा समाधिकाल श. १६९० हा आहे.

२ **काव्यसंग्रह**--लघुकाव्यमाला, भाग २ रा, पृ. ३६

३ **काव्येतिहाससंग्रह**--अनेककविकृत कविता, भाग १, पृ. १९६

अन्तर्गत पुरावा या पुस्तकांत आहे कीं काय हें सांगणें मला अशक्य आहे. परंतु येथील रॉयल् ऐशियाटिक सोसायटीच्या डॉ. भाऊ दाजी स्मारक हस्तलिखितांच्या संग्रहामध्यें '.श्यामलभाण' नांवाची एक हस्तलिखित पोथी आहे, तिच्यामधील मजकुरावरून या जीवसूनु चिंतामणीचा काल व स्थळ कळून येतें. या पोथीचा फूल्स्कॅप आकार असून तिचीं ११६ पृष्ठें आहेत. हल्लीं प्रसिद्ध होत असलेल्या नाट्यछटांसारखेंच कांहींसें या श्यामलभाणाचें स्वरूप असून या नाट्यप्रकाराला प्रदीर्घ नाट्यछटा म्हणावयास हरकत नाहीं. यामध्यें करवीर नगरींतील नवरात्रोत्सवाच्या वेळच्या निरनिराळ्या प्रसंगांचें व व्यक्तींचें वर्णन केलेलें असून कांहीं भाग तर अगदींच वात्रट वाटतो. यावरून हा ज्योतिर्विद् चिंतामणि मोठा रंगेल माणूस दिसतो. या भाणाच्या आरंभींचा मजकूरः–

"नान्द्यन्ते सूत्रधारः। सर्वतोवलोक्य । भो भो० कोल्हापूरसंज्ञिकायां नगर्यामवतीर्णायाः साक्षाद्विष्णुस्वरूपायाः श्रीमहालक्ष्म्याः शारदनवरात्रमहोत्सवकौतुकसमालोकनाय० भोसलान्वयवारिनिधिचंद्रमसा जगन्महितभूम्ना शहाजीनृपतिना विहितपालना करवीर नाम नगरी० । किं ब्रूथ । किमपि रूपकमभिनेतव्यमिति । सूत्र० क्षणं विचिन्त्य । किं नाम रूपकमभिनेतव्यमिति। स्मरणभिनीय । भो भो सभासदः । इहैव खलु ।

क्षोणीवल्लभवल्लभो गणितविद्राजन्यजीवात्मजो ।
धीमान्स्वीयपितृव्यपादकमलात्संप्राप्ततर्कागमः ।।
साहित्यादिकलाकलापचतुरः शाण्डिल्यगोत्रान्महा- ।
नब्धेरिन्दुरिवाबभूव जगतीमोदाय चिन्तामणिः ।।

शेवटचा मजकूरः–

शासति क्षितितलं शिवसूनौ शाहनाम्नि शकक्ष्छिवराजात् ।
पञ्चमेयमभिभवेदनगेन्दौ (शके १७४८) ज्येष्ठवद्यप्रतिपद्याविलोभूत् ।।

इति श्रीमज्जोतिर्विद्राजकुलतिलकायमानजीवज्योतिवित्सूनुचिंतामणिविरचितः श्यामलभाणः समाप्तिमगमत् ।

वरील मजकुरावरून सीतास्वयंवरकर्ता व श्यामलामाणकर्ता चिंतामणि एकच असून शिवाजीमहाराजांपासून पांचवा जो शहाजी राजा त्याच्या अमदानींत शके १७४८ ( इ. स. १८२६ ) मध्यें हा ग्रंथ त्यानें लिहिला असें स्पष्ट होतें. तसेंच तो कोल्हापूरकडचा असेंहि म्हणावयास हरकत नाहीं. उपरिनिर्दिष्ट शहाजी उर्फ बाबासाहेब यांची कारकीर्द इ. स.१८२१ ते १८३७ असलेली दिसते. * उद्धवचिद्घनाचा काल साधारणतः शके १५७५ ते १६२०. म्हणजे ध्रुवाख्यानाचे कर्ते म्हटल्या जाणाऱ्या या दोघां कवींमध्यें सुमारें दीडशें वर्षांचें अंतर असलेलें दिसतें. यांपैकीं कोणी कोणाचें काव्य घेतलें असें ठरवावयाचें झाल्यास चिंतामणीनें उद्धवाचिद्घनाचें घेतलें असें म्हणावें लागेल. कारण आपल्यानंतर शंभर दीडशें वर्षांनीं झालेल्या चिंतामणीच्या काव्याची चोरी उद्धवचिद्घनाला करतां येणें अशक्य आहे. शिवाय उद्धवचिद्घन हा मोठा भगवद्भक्त म्हणून प्रसिद्ध आहे. महिपतीनें भक्तविजयामध्यें त्याचें चरित्र दिलें आहे. मोरोपंतानें आपल्या सन्मणिमालेंत,

उद्धवचिद्घन केवळ मी मोर तयासमोर हर्षानें ।
तांडव करितों होउनि गतताप तदीय सूक्तिवर्षानें ॥

असा त्याचा आदरपूर्वक उल्लेख केलेला आहे. भाषेच्या व रचनेच्या दृष्टीनें सामान्य, परंतु भक्तिरसपरिप्लुत अशी उद्धवचिद्घनाची कविता वाचून हा गौरव यथार्थ वाटतो.

या प्रश्नाचा आणखी एका दृष्टीनेंहि विचार करतां येण्यासारखा आहे. तो असा कीं, उद्धवचिद्घनानें स्वतः जरी चिंतामणीच्या काव्याचा अपहार करणें शक्य नसलें, तरी पण दुसऱ्या एखाद्या माणसानें पुढें हा अव्यापारेषु-व्यापार केला नसेल कशावरून ? त्याकरितां भाषा, रचना व शब्दयोजना यांच्या दृष्टीनें चिंतामणि व उद्धवचिद्घन यांच्या इतर काव्यांशीं ध्रुवाख्यान ताडून पाहिलें असतां या शंकेचें निराकरण होण्यासारखें आहे.

* Bombay Gazetteer--Kolhapur, Vol. XXIV, P. 246

चिंतामणीच्या गोपीचंदाख्यान व सीतास्वयंवर या आर्याबद्ध कविता उपलब्ध असल्याचें वर सांगितलेंच आहे. या आर्या थेट मोरोपंती धर्तीवर रचण्यांत आल्या आहेत. त्यांची भाषा व वृत्तरचना शुद्ध असून त्या संस्कृत-प्रचुर आहेत. मासल्याकरितां गोपीचंदाख्यानाच्या *आरंभींच्या कांहीं आर्या येथें उध्दृत करतों:—

सिंदूरारुण सिंधुरवदना ! सिंधूद्भवेंदुदलनिटिला ! ।
नमितों त्वत्पद ; हें तो कवीश्वरांच्या सदर्थकलनिं टिला ।।
श्रीमद्गजाननाच्या स्मरतां पदपंकजास पातक जें ।
विघ्नानें घात जरी होइल तरि कां न शैलपात फजें ।।
ध्यातों निरंतर मनीं नरहर्यभिधान सुकुलदैवत मी ।
कीं माझ्या प्रतिभेचें न कधींहि पडो च सकुलदैव तमीं ।
राहो स्वस्थपणीं मज्जिह्वेचा करुनि शारदा माचा ।
जीणें वरिला शाश्वत वर्ण सुधाहिमतुषारधामाचा ।।
भावें नमितों चित्तीं जोडुनि कर बुद्धिदा महागुरुला ।
विद्वज्जनवृक्षवना सौरभगुणवृद्धिदा महागुरुला ।।
भावें ध्यातों प्राकृतकाव्याचार्या मयूरकविराया ।
अप्रतिभां जेंवि धना निजतापततो मयूरक विराया ।।

या कवितांवरून चिंतामणीची काव्यशैली कळून येऊन तो मोरोपंतानंतर झाला हेंहि त्यानें त्याला नमन केलें असल्यावरून दिसून येण्यासारखें आहे.

आतां ध्रुवाख्यान पाहिलें तर त्यांत भाषेच्या व वृत्तरचनेच्या मनस्वी चुका आहेत. शुद्धलेखनाकडे त्याच्या कर्त्यानें मुळींच लक्ष दिलेलें नाहीं. शिवाय तें कांहीं ठिकाणीं दुर्बोध वाटतें. दिंडी हें संस्कृत वृत्त नाहीं. अभंग, साकी, ओवी, घनाक्षरी यांच्याप्रमाणेंच दिंडी हा प्राकृत छंद आहे. या वृत्ताला अक्षरांचा निर्बंध नाहीं, परंतु मात्रांचें निबंधन आहे. तें असें कीं, दिंडीच्या चार चरणांपैकीं प्रत्येकास एकोणीस मात्रा असतात. यांतील नवव्या मात्रेवर

* काव्यसंग्रह–अनेककविकृत लघुकाव्यमाला, भाग ४

अवसान येतें म्हणून नऊ मात्रांचा एक व दहा मात्रांचा एक, असे प्रत्येक चरणाचे दोन भाग होतात. हें वृत्ताचें नियमन कवीनें बिलकूल पाळलेलें नाहीं. त्यामुळें ऱ्हस्वाचा दीर्घ करून ओढूनताणून कसें तरी तें काव्य गानक्षम करावें लागतें. चिंतामणीच्या नांवावर असलेल्या उपरिनिर्दिष्ट आर्याबद्ध काव्यामध्यें वृत्ताची चांगलीच काळजी घेतलेली आहे. परंतु उद्धवचिद्घनाची एकंदर कविता हुबेहूब ध्रुवाख्यानासारखी आहे. विशेषतः उद्धवचिद्घनाची 'शुकरंभासंवाद' व 'श्रियाळचरित्र' हीं दोन दिंडी वृत्तांतच असलेलीं काव्यें वाचावीं, म्हणजे ध्रुवाख्यानाचा कर्ता व त्यांचा कर्ता एकच आहे याबद्दल खात्री होते. कारण वृत्तरचनेचें शैथिल्य दोघांमध्यें सारखेंच आहे. इतकेंच नव्हे तर विशिष्ट शब्द ठराविक अर्थानें या सर्व आख्यानांमध्यें दिसून येतात. तसेंच जवळजवळ सारखींच वाक्यें ध्रुवाख्यान व श्रियाळचरित्र आणि शुकरंभासंवाद यांमध्यें आढतात. संवादपद्धतीहि एकच. ध्रुवाख्यानामध्यें जे काव्याचे गुण व दोष आहेत, तेच उद्धवचिद्घनाच्या इतर कवितांमध्यें आहेत. खालील उदाहरणांवरून हा मुद्दा जास्त स्पष्ट होईल:--

| **ध्रुवाख्यानांतील चरण.** | **उ. चि. इतर काव्यांतील चरण.** |
|---|---|
| सुकुमार **आकर्ण** पद्मनेत्र ।<br>**ढाणमाण** रेखिलें जेंवि चित्र । | साजिरें सुंदर **ढाण** विशाल डोळे **आकर्ण**<br>कंचुकीचें संकोच **ढाणमाण** । श्रि० (पद) |
| **राजदृष्टीसन्मुख उभा** ठेला । | **राजदृष्टीसन्मुख उभा** राहे । श्रि० |
| पिता पाहे तों **मोह झळंबला** । | **मोह** ममतेचा वायु **झळंबला** । श्रि० |
| वसे कोठें तो सांग **लवलाहे** । | मृत्युलोकासी जाय **लवलाहे** । शु० |
| **निरंजनी** धुंडिती निराहारी ।<br>**निरंजनी** जावोनि उभा राहे । | **निरंजनी** उद्यान विवेकाचें । शु० |
| **शिरीं सुरवरीं सुमनवृष्टि केली** । | **सुरीं सुमनवृष्टि वरी केली** । शु० |
| जवळ येवोनी पुसे बालकासी ।<br>वय सान तूं कोण वनवासी । | म्हणे, "स्त्रीये! एकली वनामाजी ।<br>यौवनांगी फीरसी कोण काजीं ॥ शु० |
| पांच वर्षें लोटलीं **ध्रुवा-अंगीं** । | **शुका-अंगीं** निज शांति दुणावाली ।शु० |

**अनूतापें** कोंदला दिशा दाही । त्या तीव्रा मांडिलें **अनूतापें** । ध्रु०
म्हणे **देव, 'तूं माग इच्छितासी'** । राव बोले, **'तूं माग इच्छितासी'** । श्रि.

'बालका, तूं भूषण आम्हां होशी ।
नाहि दूजें आमुचे सुवंशासी ' ॥

' सख्या, संसारतारक तूं होशी ।
सत्य रक्षाया कुळीं जन्म घेसी' ॥ श्रि०

**येरु बोले**, 'पाहीन पिता माझा' । येरु बोले, ' तूं धन्य सूर्यवंशी ।

राय बोले, ' देईन एकदेश ' ।
ध्रुव बोले ' देईल जगदीश ' ।

राव बोले, 'तूं आरणासि देता' ।
येरु बोले, 'तूं मागत्याचा दाता' । श्रि०

**पांच गांव दीधले** फीर मागें । **एक पुत्र दीधला** तूजसाटीं । श्रि०
राय झाला घाबरा **मोह-संगें** । तेंवि आयुष्य वेंचि **भोगसंगें** । ध्रु०

राव, राय, बुजावणें, लवलाहीं, धरा, अनुताप, असे कांहीं विशिष्ट शब्द त्याच्या कवितांमध्यें फार आढळतात. 'भार्या'बद्दल ' भाजा ' हा शब्द ध्रुवाख्यानामध्यें तीनकडे आलेला आहे:—

राज**भाजेनें** पदीं लोटियेलें ।
नेणों काय मारिलें दुष्ट **भाजें** ।
नको जाऊं मारील राज**भाजा** ।

हाच शब्द उद्धवचिद्घनाच्या कवितेंत इतरत्र आढळतो:—

' जिंतिसि तूं जरि भोगिसि मेदिनि कीति स्त्रिया सहसातहि **भाजा** '
—भगवद्गीता, अध्याय २-३७

हें जें विलक्षण साम्य ध्रुवाख्यान व उद्धवचिद्घनाचीं दोन काव्यें यांच्यामध्यें दाखविलें, त्यावरून हीं सर्व काव्यें प्रसवणारी लेखणी एकच आहे, असें निःशंकपणें म्हणतां येतें. १९०२ सालीं ज्या वेळीं कै. नारायण चिंतामण केळकर यांनीं उद्धवचिद्घनाचा कवितासंग्रह संपादिला, त्या वेळीं ध्रुवाख्यान त्यांना सांपडलें नाहीं. परंतु असें एक काव्य या कवीनें केलेलें आहे, हें त्यांना माहीत होतें. कारण, 'या कवीचें (१) **ध्रुवाख्यान**, (२) भक्तकथामृतसार, (३) भक्तकथातत्त्व, आणि (४) साकीबद्ध भगवद्गीता हे ग्रंथ असल्याचें समजतें. " असें त्यांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे. "कृष्णा धांव रे ! लवकरी।

संकट पडलें भारी ।। " असा एक उद्धवचिद्घनाचा सुप्रसिद्ध धांवा आहे.* यांतील " द्रौपदी लोळत हरिचरणा । उद्धवचिद्घन जाणा । " या शेवटच्या चरणांतील उद्धवचिद्घनाच्या ठिकाणीं चिंतामणि हें नांव एका जुन्या वहींत वाचल्याचें श्री. आजगांवकर आपल्या महाराष्ट्रकविचरित्रांत ( भाग ३, पृष्ठ १२३ ) लिहितात. त्यावरून चिंतामणीनें दुसऱ्यांच्या काव्यांवर आणखीहि हात मारलेला दिसतो ! पण येथें शंका उद्भवते ती ही कीं, श्यामलभाणासारखें संस्कृत लिखाण करणाऱ्या माणसाला परक्यांच्या कृतीचा अपहार करण्याची बुद्धि कां व्हावी ? आणि तीहि उद्धवचिद्घनाच्या अशुद्ध काव्यांची ! गोड आवाज असलेल्या एखाद्या माणसानें एखादें पद गायिलें म्हणजे गायनशास्त्रदृष्ट्या तें जरी कितीहि अशुद्ध असलें, तरीपण त्याच्या ईश्वरदत्त देणगीमुळें तें जसें लोकांना मोहूं शकतें, तसें छंदःशास्त्र किंवा व्याकरणशास्त्र यांच्या दृष्टीनें अगदीं गचाळ असलेलें हें ध्रुवाख्यान काव्य केवळ उद्धवचिद्घनाच्या भक्तिभावाच्या नितांत जिव्हाळ्यामुळें सुरससुंदर वठलें आहे यांत मुळींच शंका नाहीं. परंतु त्याची चोरी करण्याइतका मोह एखाद्या संस्कृतज्ञ माणसाला होणें अशक्य दिसतें; आणि त्यामुळें सीतास्वयंवराचा व ध्रुवाख्यानाचा चिंतामणि एक असें जें कै. ओक यांनीं म्हटल्याचें वर सांगितलें आहे, तें त्यांचें विधान अगदींच चुकीचें वाटतें. ध्रुवाख्यान चोरणारा चिंतामणि श्यामलभाण किंवा सीतास्वयंवर यांच्या कर्त्याहून अगदीं निराळा असला पाहिजे. केवळ नामसादृश्य पाहून चालणार नाहीं. इतर आजूबाजूच्या गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. नाहींतर चोर बाजूलाच राहून संन्याशी सुळीं जाईल ! हा चिंतामणि कोणीहि असला तरी हा जो अन्तर्गत व बहिर्गत पुरावा पुढें आणिला आहे त्यावरून ध्रुवाख्यान काव्य उद्धवचिद्घनाचेंच आहे, याबद्दल माझ्याप्रमाणें वाचकांचीहि खात्री होईल असें वाटतें. ध्रुवाख्यान उद्धवचिद्घनाचें हा शोध माझा नाहीं. ही शंका जुनीच आहे. मी जर कांहीं केलें असेल तर ही शंका खरी असल्याचें सप्रमाण दाखविलें आहे इतकेंच. या

* **काव्यसंग्रह**– उद्धवचिद्घनकृत कवितासंग्रह, पृ. १२३

विषयाची जास्त चर्चा करून माझ्या या विवेचनांत कोणींहि न्यूनाधिक दाखविल्यास मी त्याचा आभारी होईन. ध्रुवाख्यान काव्य १९३३ सालच्या मॅट्रिकच्या परीक्षेला चिंतामणीचें म्हणून नेमिलेलें आहे. तें उद्धवचिद्घनाचें, यासंबंधीं केलेलें वरील विवेचन जर विद्वान् लोकांना पटलें तर त्याच्या खऱ्या जनकाची विद्यार्थ्यांना माहिती करून देणें अवश्य आहे. आज कित्येक वर्षें वाङ्मयसृष्टीमध्यें चाललेला हा अन्याय दूर झाला तर माझे परिश्रम सुफलित झाले असें मी समजेन. *

---

## ध्रुवाख्यान

### (खूण केलेले चरण चिंतामणीच्या नांवावरील आख्यानांत नाहींत)

### दिंडी

सूर्यवंशीं उत्तानपाद राया । रूपवंती तयास दोन जाया ॥
कनिष्ठेसी अत्यंत प्रीतिमाया । पट्टराणी नावडे तया राया ॥ १ ॥
वरिष्ठेसी जाहला एक पुत्र । भक्तराज वैकुंठपाळ मित्र ॥
सुकुमार आकर्ण पद्मनेत्र । ठाणमाण रेखिलें जेंवि चित्र ॥ २ ॥
पांच वर्षें लोटलीं ध्रुवा अंगीं । पिता ठाउक तो नाहिं तयालागीं ॥
पुसे मातेसी भक्तराज-योगी । तात कोठें तो सांग मज वेगीं ॥ ३ ॥
म्हणे माय तान्हया तोचि तूझा । धराधीश बोलती ज्यास राजा ॥
येरु बोले पाहीन पिता माझा । नको जाऊं मारील राजभाजा ॥ ४ ॥
पूर्वपुण्यें सुदिन ऊगवला । मुलांसंगें तो राजगृहा गेला ॥
**राजदृष्टीसन्मूख उभा** ठेला । पिता पाहे तों **मोह झळंबला** ॥ ५ ॥
अनिवार मोहासि पूर आला । ऊचलोनी मांडिये बैसवीला ॥
बाळशब्दें खेळवी तनूजाला । न साहेचि राणीसि कोप आला ॥ ६ ॥

---

* ता. १३-१२-३१ रोजीं, मुंबई येथील मराठी वाङ्मयसेवामंडळापुढें रा. श्री. म. वर्दे, वकील यांच्या अध्यक्षतेखालीं वाचलेला निबंध.

उचंबळे क्रोधाग्नि-शिखा टाकी । म्हणे कोण बैसला राजअंकीं ॥
**राव** कैसा खेळवी कवतूकीं । ध्रुवराज होईल निश्चयें कीं ॥ ७ ॥
धरूनीयां सापत्नभाव चित्तीं । पदीं लोटोनी पाडियेला क्षितीं ।
रडत गेला माउली जेथ होती । न खंडेच तैं नेत्र अश्रुपातीं ॥ ८ ॥
म्हणे माय तान्हया काय झालें । कोणें पापीयें तूज गांजियेलें ॥
मज रायें मांडिये बैसवीलें । राजभाजेनें पदीं लोटियेलें ॥ ९ ॥
बुजावीतां माउली काय बोले । + स्वामि जैसें मांडीस बैसवीलें
नाहिं पूर्वीं देवासि पूजियेलें । + रमारंगें स्थापितां काय चाले ॥ १० ॥
ध्रुव बोले तो देव कसा आहे । वसे कोठें तो सांग लवलाहे ॥
+ तया मागो अविनाश एक ठाय । + पद मागों नूठवी दुजी माय ॥ ११ ॥
+ अरे बाळा वल्कलें जटाधारी । + भस्म अंगीं लाविती दिगंबरी ॥
+ सर्व भोगीं ऊदास ब्रह्मचारी ॥ + निरंजनी धुंडिती निराहारी ॥ १२ ।
+ अधोमूख पंचाग्नि धूम्रपानी । + उर्ध्वबाहू आकाशिं महामूनी ॥
+ शीत उष्ण पर्जन्य ताप तीन्हीं । + जया अंगीं सोशिती महामूनी ॥ १३ ॥
तुझी बुद्धी काय बा वय सान । तुज काय होईल दरशन ॥
ध्रुव बोले सांडीन निजप्राण । न भेटे तो देणार दरशन ॥ १४ ॥
उभा होता तैसाचि जाय वेगीं । रडत पाठी लागली माय मार्गीं ॥
पुत्र गेला रायासि दूत सांगे । राय झाला घाबरा मोहसंगें ॥ १५ ॥
सर्व सौख्याचें मूळ बाळ माझें । ध्रुव गेला घेणार राज्यओझें ॥
त्यजिल प्राण काननीं लोकलाजें । नेणों काय मारिलें दुष्ट भाजें ॥ १६ ॥
लवलाहें लागला ध्रुवापाठीं । म्हणे बाळा आईक एक गोष्टी ॥
बुजावीतों धरूनि हनूवटी । तुजवीण दाटला प्राण कंठीं ॥ १७ ॥
+ ध्रुव बाळ चालला हृषीकेशी । + **बालका तूं भूषण अम्हां होसी**
+ **नाहिं दूजें आमुचे सुवंशासी** । + तुजवीण होऊं गा परदेशी ॥ १८ ॥
नको जाऊं देईन एक गांव । ध्रुव बोले देईल देवराव ॥
**पांच गांव दीधले** फीर मागें । ध्रुव बोले देइजे रमारंगें ॥ १९ ॥

नको जाऊं देईन एक देश । ध्रुव बोले देईल जगदीश ॥
+ फीर मागें देईन एक प्रांत । + ध्रुव बोले देईल रमाकांत ॥ २० ॥
अर्ध राज्य दीधलें फीर त्वरित । + ध्रुव बोले देईल जगंनाथ ॥
सर्व राज्य दीधलें आण तूझी । ध्रुव बोले देवास लाज माझी ॥ २१ ॥
+ सहज बोलाचा राग धरीयेला । + सहज हास्याचा निकुर कसा केला ॥
+ पुत्रविरहाची गमे मला खंती । +नमस्कारें अपराध क्षमा होती ॥२२॥
+ प्रेममर्यादेचि या सिमा नेणें । + बाळशब्द आशब्द काय जाणें ॥
+ म्हणे **उद्धवचिद्घन** दयावंत । + शांत दांत आनंद कृपावंत ॥२३॥
ध्रुवा कैसा सांडिला मोह आजी । तोंड काळें जाहलें जगामाजी ॥
ध्रुव बोले तयासि तातदेवा । अतां येतों मी लोभ असों द्यावा ॥ २४॥
+ हरीभक्तीचा डौल कसा पाहीं । + अनुतापें कोंदल्या दिशा दाही ॥
म्हणे धांव पाव गा मायबापा । कृपावंता अनंत शांतरूपा ॥ २५ ॥
निरंजनी जाऊनि उभा राहे । नामघोषें तें मूख गर्जताहे ॥
दुरूनीयां काननीं सुता पाहे । तयालागीं कैवल्य दीसताहे ॥ २६ ॥
जवळ येवोनी पुसे बाळकासी । वय सान तूं कोण वनवासी ॥
पूर्ववृत्त सांगतां नारदासी । कृपायोगें तोषला देवऋषी ॥ २७ ॥
गुरुमंत्रावांचोनि देव कैंचा । असें बोले सर्वही वेदवाचा ॥
अभयहस्त ठेवोनि शिरीं साचा । मंत्र सांगे तैं द्वादशाक्षरांचा ॥ २८ ॥
ध्रुवा कानीं सांगोनि मुनी गेला । जपतांची हृदयीं प्रकाशला ॥
+ लोकलीला वैकुंठपाल आला । **तया दृष्टीसन्मूख उभा** ठेला ॥२९॥
+ सर्व तेजाची एकमूस झाली । + दिव्यकांतीची दीप्ति प्रकाशली ॥
चतुर्भूज सायूध घननीली । दिव्यमूर्ती त्या ध्रुवें देखियेली ॥ ३० ॥
**नमस्कारें** पूजिला हृषीकेशी । म्हणे देव, '**तूं माग इच्छितासी** ॥
+ 'मनोवेगाचा वास तुझे पायीं । + गर्भवासें कष्टलों वदों कायी' ॥३१॥
' धराधीश कीं स्वर्ग-भोग-वासी । + करूं इंद्र कीं सांग आपणांसी ॥
'तुझे भक्तीचा डौल कसा देई । पद दीजे नूठवी दुजी आई ' ॥ ३२ ॥

देवयानीं वाहोनि ध्रुव नेला । अढळ सुपदीं नेवोनि बैसवीला ॥
ध्रुवाख्यान ऐकती गाति वाचे । ध्रुवलोकीं अक्षयी वास त्यांचे ॥ ३३ ॥
+ ब्रह्मानंद आनंद थोर झाला । + अढळपदीं तो ध्रुव बैसवीला ॥
+ बालशक्तीची बहुत धन्य झाली । + शिरीं सुरवरीं सुमनवृष्टि केली ॥ ३४ ॥
चंद्रसूर्यादि ग्रहगण तारा ॥ मुनी सर्व घालिती ज्यास फेरा ॥
+ औदार्यंची क्षीराब्धिशयनाचें । + उद्धवचिद्घन गूण गाय त्याचे ॥ ३५ ॥

---

## श्रियाळचरित्र

(दिंडी वृत्त)

गुरू पावूलें आठवूनि चित्तीं । वरी आपुला आणिला संतीं ॥
निज ज्ञानें मज बोलविलें श्रोतीं । कथा ऐकतां हरे मोहभ्रांती ॥ १ ॥
करा आनंदघोष हरीनामें । वरी टाळीया वाजवुनी प्रेमें ॥
क्षितीपृष्ठीवरि मोक्षपुऱ्या साती । त्यांत काशी बरि वानियेलि संतीं ॥ २ ॥
तिथें राजा श्रीयाळ पुण्यकीर्ति । अन्नदानें शिव वोळगिला भक्ती ॥
इच्छिलें दे भोजन सर्वकाळीं । सर्व सुखाडें दीनजना पाळी ॥ ३ ॥
असें ऐकूनीं पंचवक्रधारी । येत भेटीसी होउनी भिकारी ॥
गलित कुष्ट दुर्गंधि अती भारी । त्रास घेती पाहूनि नरनारी ॥ ४ ॥
**राजदृष्टीसन्मुख उभा** राहे । कपटवेषानें सत्त्व कसा पाहे ॥
म्हणे, 'राया इच्छीत अन्न देसी । आलों ऐकूनी दूरदेशवासी' ॥ ५ ॥
**राव बोले 'तूं माग इच्छितासी ।' येरु बोले,** 'तूं धन्य सूर्यवंशीं ॥
नरमांसाच्या भोजनासि देईं' । अंगिकारोनी भूप नमी पायीं ॥ ६ ॥
'नको धर्मा देऊं येर चोर । नको विक्रीत पापशरीर ॥
नको अन्यायी दुष्ट अपस्मार । नको अमंगळ रोग विकार' ॥ ७ ॥
**राव बोले,** 'मी आपणासि देता ।' **येरु बोले,** 'तूं मागत्याचा दाता' ॥
पुढें ठाके चांगुणा पतिव्रता । म्हणे भिक्षुक, 'मागत्याचि माता ॥ ८ ॥

तुझें येकची येकलें तें बाळ । अति सुकुमार नाम चिल्हाळ ।।
देइं सप्रेमें मज मांसकवल । करीं संतृप्त क्षुधातृषाव्याल' ।। ९ ।।
असें ऐकतां तोष बाळकासी । म्हणे, 'धन्य मी तुमचिये कूशीं ।।
करा अर्पण भूक अतीतासी । नाशवंत हें येत कारणासी' ।। १० ।।
'सत्वें सद्भावें बालकासि देतां । नव्हें व्याघ्र मी फाडुनियां खाता ।।
कुटा कांडा पाक करा तुम्हीं आतां । खेद मोह तो टाकुनियां चिंता ।।११।।
पतिव्रता चांगुणा माऊली । बाळ उचलूनी गृहामाजि गेली ।।
धरी पोटाशीं मुखीं मूख घाली । अतिकरुणें शांतवा बाळ बोली ।।१२।।
'सख्या, संसार तारक तूं होसी । सत्य रक्षाया कुळीं जन्म घेसी ।।
निज हस्तें रे ! तुज पुढें धाडीं । मोक्षपुरींची वाट बरी काढीं ।।१३।।
खडे कंटक कर्म कूप झाडीं । सत्त्व सामर्थ्यें शिवपद जोडीं ।। '
विळी पाटावरि वाम चरण ठेवी । बाळ उचलूनी धार गळां लावी ।।१४।।
बळें कापीतां नेत्रकमल लावी । मान कापून शीर मनी भावी ।।
**मोह ममतेचा वायु झळंबला** । आधिं अतीता जेंवि भुकेला ।।१५।।
डोळां पाहेन कसा हरपला । शीर ठेवून धडा पाक केला ।।
पूजि अतीता, ताट पुढें ठेवी । येरु न जेवी उभय नेत्र लावी ।।१६।।
'अपवित्र हें मांस कोण जेवी ? । शीर रांधूनी भीक घालावी' ।।
सती वीनंती करी महादेवा । 'क्षमा अपराध करूनियां जेवा' ।।१७।।
माय मस्तक ऊखळांत कांडी । गाय ओंवींया शंकरासि तोंडीं ।।
पाक संपादी ताट पुढें मांडी । येरु जेवीना घांस न घे तोंडीं ।। १८ ।।
'तुह्मां दोघांसि उपवासि ठेवूं । मीच येकला काय म्हणुनि जेवूं ? ।।
वरी हांसेल देव महादेवू । असें भूकेलों अन्य घरा जाऊं' ।। १९ ।।
पतीलागीं वीनवी पतिव्रता । 'उदरिं माझीये नव मास होता ।।
काय दिवसानें भार नव्हे आतां ? । बसा सांगातीं जेवूं अतिथि आतां।।२०।।
दोघें आणूनी बैसविलीं पात्रीं । तरी अतीथी घांस न घे हातीं ।।
'निपुत्रीकाचें अन्न अधःपातीं । टाकि घेऊनी कोण जेवितातीं' ।।२१।।

'**एक पुत्र दीधला** तूजसाठीं । तूंचि निंदितोसि आम्हां दोषदृष्टी ।।
देइ पायींच ठाव नीज पीठीं '। झाला अतीत शीव जगज्जेठी ? ।। २२ ।।
जटा मस्तकीं विखूरल्या भारी । मागें गंगेचें वाहतसे वारी ।।
सर्व विशाळ भस्मचंद्र धारी । रजतपर्वतीं मदनदहनकारी ।। २३ ।।
' झालों संतुष्ट तुमचिया बोला ' । मातापित्यासि पुत्र भेटवीला ।।
नमस्कारें वीनवी उभयतां । ' नसे मागणें तूंचि जेविं आतां ' ।। २४।।
देईं पायींच ठाव उमाकांता ! तुझी भक्ती मज द्यावि हेचि आस्ता ।।
औट घटकेचें राज्य शिवा ! द्यावें । नगर आम्हांसहीत उद्धरावें ।।२५।।
पुढें ऐसें कोणास न पीडावें । केलें तैसेंची बोलियलें देवें ।।
म्हणे उद्धव–चिद्घन पाहीं । राज्य ठेवीलें त्यासि भय नाहीं ।। २६ ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. ४६१४
REFBK-0004614

मुद्रकः-श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
'राजगुरु आणि कंपनी' प्रेस, ५१३ शनवार पेठ, पुणें शहर.
प्रकाशकः-गणेश गंगाधर जांभेकर, २६४ सदाशिव पेठ.

# ध्रुवाख्यानाचा खरा कर्ता उद्धवचिद्धन

**रा. रा. चिं. वि. वैद्य**—"रा. प्रियोळकर यांनी उद्धवचि
हा मराठींतील सुप्रसिद्ध व लोकप्रिय ध्रुवाख्यानाचा कर्ता होय, चिं
मणि नव्हे असें जें मत प्रतिपादन केलें आहे, तें मला वाटतें स
ग्राह्य आहे...."

**प्रो. ना. के. भागवत**—( झेवियर कॉलेजांतील मराठीचे अ
पक व मुंबई युनिव्हर्सिटीच्या मराठी बोर्ड ऑफ स्टडिज्चे अध्य
...."रा. प्रियोळकर यांनीं वाङ्मयसंशोधनक्षेत्रांत हा जो शोध ल
आहे, तो नियमशुद्ध व शास्त्रीय टीकेस धरून असल्यामुळें त
सिद्धांत अबाधित आहे, असें मला वाटतें. त्यांच्या **रघुनाथ पंडि**
वरील निबंधावरून अगोदरच त्याचें नांव महाराष्ट्रास परिचित
आहे, त्यांच्या या कीर्तींत हा निबंध भरच टाकील अशी
खात्री आहे.

रियासतकार **गो. स. सरदेसाई**—"आपण एक चांगला
ग्रस्त मुद्दा या निबंधांत निकाल करून दिला आहे. सामान्य प्र
समजूती कशा भ्रामक असतात हें यावरून दिसून येतें....

**ज्ञानप्रकाश**—( २७-४-३२ ) ध्रुवाख्यान १९३३ सा
मॅट्रिकच्या परीक्षेला **चिंतामणीचें** म्हणून नेमलें आहे, तें वस्तुतः उ
**चिद्धनाचें** काव्य आहे ही गोष्ट या निबंधावरून पटण्यासारखी आहे.

Cover Page Printed by Indu Prakash Press Bombay 2.